नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/04/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. नरखेड :- फिर्यादी/पिडीता वय १३ वर्ष ०४ महिने यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. १४२/२० कलम ३६३, ३२३, ३७६(२) (जे), ३७६(३) भादवि. सहकलम ४ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **आरोपी नामे- शब्बीर शहा बब्बु शहा, वय २६ वर्ष रा. इंदीरा नगर नरखेड** व फिर्यादी हे एकाच गावात राहत असुन आरोपी हा आईसक्रीम विकायचा धंदा करीत असुन यातील आरोपीने अल्पवयीन फिर्यादीस मी तुझे फोटो व व्हिडीओ काढलेले आहेत, तु माझेसोबत चल नाहीतर तुझे फोटो/व्हिडीओ व्हायरल करेल अशी धमकी दिली (आरोपीकडे असे कोणतेही व्हिडीओ व फोटो नव्हते) व जबरदस्तीने फिर्यादीला मोटार सायकलवर बसवुन पिंपळगाव येथील वखाजीच्या तलावावर घेउन गेला. तेथे नेवुन फिर्यादीच्या गालावर चापट मारून अल्पवयीन फियादीशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि सोनाली जगताप पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक ११/०४/२०२३ रोजी कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. एक्स्ट्रा डी. जे. जैस्वाल सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३७६ भादवि मध्ये ७ वर्ष सश्रम कारावास व ३०००/-रू दंड , दंड न भरल्यास १ महीने साधी कैद. कलम ३५४ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/- रू दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद, कलम ४५२ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५००/- रू दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद तसेच कलम ३२३ भादवि मध्ये ६ महिने सश्रम कारावास व ५००/-रू दंड ,दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एडीपी शेख मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/१२०४ सुरेंद्रसिंग ठाकुर पो.स्टे. नरखेड यांनी मदत केली आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १८ कि. मी. अंतरावरील मौजा माळेगाव शिवार येथे दिनांक ०९/०४/२०२३ चे रात्री ००.०० वा. ते दिनांक ९/०४/२०२३ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान यातील नमुद घटनास्थळावरील कृषी पंपाचे विदयुत कनेक्शन करिता जाणाऱ्या लघुदाब विदयुत वाहिनीचे ॲल्युमिनियमचे तार अज्ञात चोरटयांनी चोरी करून नेल्याचे व पोल पाडल्याचे तक्रार वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. प्रशांत मनोहर ठाकरे यांनी पाहणी केली असता, घटनास्थळी ०६ गाडयांमधील ०३ फेज वायरचे १४४० मीटर ॲल्युमिनियम तार व सदर किंमतीचे विदयुत तार चोरी झाले आहे. अशाप्रकारे विज कंपनीचे २००००/– रू चे किंमतीचे विदयुत तार चोरी झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय अन्नाजी गहाणे वय ५४ वर्ष रा. अभि. म. रा. वि. वि. कं. मर्या. वी. वी. के झिल्पा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संतोष राठोड मो. नं. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.

## केबल वायर चोरी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील सोनोली ता. कळमेश्वर येथे दिनांक ०८/०४/२०२३ चे ००/०० वा. ते दिनांक ०९/०४/२०२३ चे ०६/०० वा. पर्यंत यातील फिर्यादी नामे– सुरज भुमेश्वर मेश्राम, रा. सोनोली ता. कळमेश्वर हे सोनोली गावाचे प्रभारी सरपंच असुन ग्रामपंचायत सोनोली गावाचे विहीरीतुन पिण्याचे पाण्याचे नळा द्वारे पूरवठा करण्याकरीता इलेक्ट्रीक मोटार सन २००४ पासुन लावलेली असून नवीन इलेक्ट्रीक मोटार सन २०१९ मध्ये लावली असून दि. ०८/०४/२०२३ रोजी पाण्याची मशीन चालु करण्यासाठी पाणी पुरवठा करणारा कर्मचारी नामे– बाबूलाल संपतराव वाघाडे हे गेले असता त्यांना मशीनला लागलेला नीळा व काळया रंगाचा केबल वायर १८० फुट किंमती अंदाजे ५०००/–रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. राजेंद्र यादव ब. नं. १६३९ मो. क्र. ७०२०६२६०४७ हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील धानला मौदा येथे दिनांक ०९/०४/२०२३ चे १८/३० वा. ते १८/४५ वा. सुमारास आरोपीचे सासरे यांचे घर फिर्यादी नामे– शंकर फत्तु उके, वय ६६ वर्ष, रा. धानला यांचे घरासमोर आहे. मागील ६ महीन्या अगोदर फिर्यादी हे हाथ ठेल्याने तनीस आणीत असता **आरोपी नामे– रमाकांत तिवारी, वय ५० वर्ष, रा. चिचोली ता. मौदा** याचा मुलगा त्याच्या मोटार सायकलला फिर्यादीच्या हातठेल्याची ठोस लागल्याने तोंडी वादविवाद झाला होता. यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हे स्वत:च्या घरासमोर उभे असता यातील आरोपी मागेहुन आला व ६ महीन्या अगोदर माझ्या मुलासोबत भांडण केले होते असे म्हणुन माहार आहा तुम्ही माझे काय बिघडउ शकता असे म्हटले असता ६ महीन्याचा झगडा आता कशाला काढत आहात असे म्हणुन खाली पडलेली काडी उचलुन फिर्यादीचे डोक्याला मारले बाक्यावर मारले फिर्यादीच्या बाक्याला मुका मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम कलम ३२६ भादवी, ३(१) (एस), ३(२) (५) अनुसुचित जा. अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अशित कांबळे रामटेक विभाग रामटेक हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**